गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक ३३९ वा | सोमवार २९ एप्रिल २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 339 | Date : 29/04/2024 blow Monday Page 4 Price 4

## मोदींचे महाराष्ट्रात सतत येणे हाच मराठ्यांचा विजय

जालना : पंतप्रधान नरेंद्र मोदी शक्यतो स्वतःचे चिन्ह सोडून कधीच दुसऱ्याच्या प्रचाराला गेले नाहीत. मराठा समाजाच्या एकीची भीती निर्माण झाली आहे. येथेच मराठा जिंकला, त्यांना प्रत्येक टप्प्यात पंतप्रधान मोदी यांना आणावे लागत आहे. म्हणजे यांना मराठ्यांची प्रचंड भीती आहे, अशा शब्दांत मनोज जरांगे-पाटील यांनी महायुतीवर निशाणा साधला. लोकसभा निवडणूक २०२४ च्या दोन टप्प्यांतील मतदान पार पडले आहे. येत्या ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. मोदी वारंवार महाराष्ट्रात सभा घेत आहेत. मोदींच्या या सभेवरून मराठा आंदोलक जरांगे यांनी महायुतीवर निशाणा साधला. पुढे बोलताना जरांगे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत मी नाही. मराठा समाजाने आता ठरवायचे आहे. समाजाचा आता नाईलाज आहे. आम्ही कुणाला पाठिंबा दिलेला नाही. जो सगेसोयरे या विषयाच्या बाजूने आहे त्यांचा विचार करा. जो सगेसोयरे विषयाच्या बाजूने नाही त्यांना असे पाडा की त्यांच्या दोनतीन पिढ्या पुन्हा वर येऊ नयेत, असे प्रतिपादन त्यांनी केले.

# स्वातंत्र्याच्या दुसऱ्या दिवशी मंदिर बांधण्याचा निर्णय घ्यायला हवा होता

बंगळुरू : प्रभू श्रीरामाचे मंदिर बांधण्याचा निर्णय हा देशाच्या स्वातंत्र्याच्या दुसऱ्या दिवशी घ्यायला हवा होता, पण त्यांनी तसे केले नाही असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते उत्तर कर्नाटक भागात एका निवडणूक रॅलीला संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर पुन्हा एकदा जोरदार निशाणा साधला. काँग्रेसने राम मंदिराचे निमंत्रण नाकारले, परंतु अन्सारी कुटुंबाने यासाठी न्यायालयात पिढ्यान्पिढ्या लढा दिला आणि सांगितले की येथे बाबरी मशीद होती, राम मंदिर नाही. परंतु ज्या दिवशी न्यायालयाचा निर्णय आला ते म्हणाले की, न्यायालयाचा निर्णय आमच्यासाठी सर्वतोपरी आहे आणि अन्सारी यांनी मुस्लीम असूनही राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सहभाग घेतला. हा नेमका फरक असतो. या देशाला विकास हवा आहे आणि वारसाही हवा आहे. आपल्या पूर्वजांनी अयोध्येत रामासाठी ५०० वर्षे लढा दिला, लाखो लोकांचा मृत्यू झाला. प्रभू श्रीरामाचे मंदिर बांधण्याचा निर्णय देशाच्या स्वातंत्र्याच्या दुसऱ्या दिवशीच घ्यायला हवा होता, पण त्यांनी तसे केले नाही. हे काम करण्यासाठी ५६ इंचाची छाती लागते. तेव्हाच ५०० वर्षांचे स्वप्न पूर्ण होते, ५०० वर्षांची प्रतीक्षा संपते असे म्हणत मोदींनी निशाणा साधला आहे. २०१४ पूर्वी आपल्या देशातील वर्तमानपत्रांमध्ये स्फोटांच्या बातम्या असायच्या. २०१४ नंतर देशात बॉम्बस्फोटांच्या बातम्या कमी झाल्या असे देखील पंतप्रधान मोदी यांनी यावेळी आपल्या भाषणात नमूद केले.



## महायुतीला पॉवरफुल इंजिन आहे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

बार्शी/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर जाहीर सभा संपन्न झाली.ही निवडणूक देशाचे भवितव्य ठरविणारी निवडणूक आहे. गेल्या १० वर्षांचा कार्यकाळ, देशाचा विकास आणि प्रचंड गती पाहता राष्ट्राचा विकास कोण उत्कृष्ट पद्धतीने करू शकतं याची जाणीव माय-बाप मतदार बांधवांना निश्रि्चतच आहे..

एका बाजूला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात विकासासाठी अव्याहत कार्य करणारी महायुती तर दुसऱ्या बाजूला राहुल गांधी यांच्या बरोबर २६ पक्षांची एकत्र खिचडी आहे.

महायुतीला पॉवरफुल इंजिन आहे. त्यामुळे महायुती सरकारकडून महाराष्ट्राचा, आपल्या प्रांताचा, गावाचा सर्वांगीण विकास होणार आहे.महायुती सरकारच्या गाडीत गोरगरीब, मजूर, सामान्य माणूस, शेतकरी, युवक, महिला, अल्पसंख्यांक, बहुजन अशा शेवटच्या घटकापर्यंत सर्वांसाठी । पान २ वर

## मोदी ज्या पद्धतीने देश चालवतात ते पाहून चिंता वाटते ; शरद पवार यांचा हल्लाबोल

पुणे :देशात सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आहे. प्रचाराच्या भाषणात राजकीय नेते एकमेकांवर टीका टिप्पणी करत आहेत. आज महाविकास आघाडीची सासवडमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ज्या पद्धतीने देश चालवतात ते पाहून चिंता वाटते, असे शरद पवारांनी यावेळी म्हटले.



या लोकसभेची निवडणूक वेगळी निवडणूक आहे. हा देश कोणत्या पद्धतीने चालवायचा हा प्रश्र्न या निवडणुकीचा आहे. आज नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवत आहेत, ते पाहिल्यानंतर चिंता वाटते. देश चालण्याचा अर्थ हा लोकशाहीच्या मार्गाने, लोकांना विश्र्वासात घेऊन त्यांच्या सहमतीने देशाचा कारभार करणे ही लोकशाहीची गरज आहे. आज काय चित्र दिसते. स्थानिक पातळीवर काय परिस्थिती आहे. पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या आहेत का? जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या आहेत का? नगर पालिकेच्या निवडणुका झाल्या का? किती दिवसांपासून या निवडणुका झाल्या नाहीत. या संस्था किती दिवसांपासून मोकळ्या आहेत. दोन वर्ष झाले । पान २ वर

## भाजपवाले आपल्या महाराष्ट्राचे संस्कृती आणि परंपरा आपली एकी बिघडवत आहेत:आ. प्रणिती शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधीः भाजपमध्ये लोकशाहीला दृष्टी लागली आपल्याला महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा आहे बिघडायला निघाले आहेत म्हणून हे लोक आपली संस्कृती परंपरा आपली विकी बिघडत असतील तर दुसरीकडे शेतकऱ्यांचा अंत करत असतील तर आरक्षणासाठी हे बोलायला तयार नाहीत ही खरी लोकशाहीची परीक्षा असलेली प्रतिपादन सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे महाग विजय महाविकास आघाडीच्या उमेदवार पनीती शिंदे यांनी केले आहे हुलजंती येथे सभेत बोलत असताना प्रणिती शिंदे यांनी प्रतिपादन केले आहे आज दिनांक शनिवार २७ एप्रिल २०२४ रोजी गणेश शिंदे आणि बोराळे मरवडे हुलजंती सलगर बुद्रुक पंचायत समिती गण दौरा केला यावेळी प्रणिती शिंदे बोलत होते यावेळी त्यांच्याबरोबर माणसाकडे पदाधिकारी



कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना पणती शिंदे म्हणाले की सोलापूर जिल्ह्यातील म्हणून शब्द दिला आहे पहिला आवाज लोकसभेमध्ये शेतकऱ्यांसाठी असेल पहिला आवाज पाण्यासाठी आणि आरक्षणासाठी असेल मी कामही पक्की आहे मी राजकारणात सत्तेसाठी आणि टक्केवारीसाठी आले नाही मी तुमच्या आशीर्वाद घेण्यासाठी आले आहे ही निवडणूक जरी माझी असली तरी विजय तुमचा आहे असे यावेळी पण शिंदे । पान २ वर

## केजरीवाल यांच्या याचिकेवर आज सुनावणी

नवी दिल्लीः मद्यविक्री घोटाळा प्रकरणी तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेविरोधातील आव्हान याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी होण्याची शक्यता आहे. केजरीवाल यांनी यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले होते की, या प्रकरणी त्यांना झालेली 'बेकायदा अटक' हा 'मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका' आणि 'संघराज्यवाद' यावर आधारित लोकशाही तत्त्वांवर अभूतपूर्व हल्ला आहे. या प्रकरणात त्याच्या अटकेला आव्हान देणाऱ्या त्याच्या याचिकेवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राला उत्तर देताना, केजरीवाल म्हणाले की, लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांना केलेली अटकेची पद्धत आणि वेळ ईडीचा 'मनमानी' कारभार दर्शवते. निवडणुकीशी संबंधित आचारसंहिता लागू होत असतानाच त्यांना अटक करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.। पान २ वर



## सोलापूरचे या हंगामातील सर्वाधिक तापमान ४३.७ अंशावर

सोलापूर/प्रतिनिधीः शहर व परिसरात गेल्या दोन दिवसांपासून तापमानात असह्य वाढ होऊन ते काल रविवारी या वर्षातील सर्वाधिक तापमान ४३.७ अंशांच्या घरात गेले आहे.

शुक्रवार दिनांक ५ एप्रिल रोजी या हंगामातील ४३.१ अंश इतके सर्वाधिक तापमान होते. या वाढत्या तापमानामुळे सोलापूरकर अक्षरश: हैराण झाले आहेत. सकाळी नऊपासूनच उकाडा जाणवत असून यात आबालवृद्धांना अधिक त्रास होत आहे. बुधवारी २४ एप्रिल रोजी ४१.२, गुरुवारी ४१.१, शुक्रवारी ४१.२ तर काल शनिवारी,

२७ एप्रिल रोजी ४२ अंशांच्या घरात गेले होते. काल रविवारी शहराचे तापमान यंदाच्या हंगामातील सर्वाधिक म्हणजे ४३.७ अंश सेल्सियस इतके वाढले आहे. गेल्या महिन्यात १६ मार्च रोजी ४०.२ एव्हढे तापमान होते तर २६ मार्च रोजी ४१.४ सर्वाधिक तापमान नोंदले गेले होते. असह्य तापमानामुळे सकाळी नऊ वाजल्यापासूनच अंगाला चटके बसू लागल्यामुळे नागरिकांनी रस्त्यावरून फिरणे टाळले आहे. तर दुपारी बारा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत रस्त्यावरची वाहतूक रोडावली आहे. अंगावर चटके बसू लागल्यामुळे हैराण झालेले नागरिक उन्हात कामे करणे टाळत आहेत. ऊन तथा उष्म्यापासून सुटका होण्यासाठी थंडपेयांचा आधार महत्त्वाचा वाटू लागला आहे. डोक्यावर उन्हाळी टोप्या, खांद्यावर पांढरे गमजे घालणे पसंत केले जात आहे, तर महिलावर्ग तोंडावर स्कार्फ घालून फिरताना दिसत आहेत. परंतु ज्यांचे हातावर पोट आहे, अशा कष्टकरी व हमालांना भर उन्हात कामे करावी लागत आहेत.

## निवडणुका पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे : मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम




मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक विषयक आढावा

सिंधुदुर्ग : मतदारांना सुलभपणे तसेच शांततापूर्ण वातावरणात मतदान करता यावे यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे, त्यादृष्टीने मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन त्याची माहिती मतदारांना द्यावी, आगामी लोकसभा निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने सर्व घटकांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक विषयक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशोर तावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मकरंद देशमुख, सहायक जिल्हाधिकारी विशाल खत्री, सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अतिरिक्त अधीक्षक कृषिकेश रावले, अपर जिल्हाधिकारी रवी पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी बालाजी शेवाळे तसेच । पान २ वर

## काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवल सिंह मोहिते पाटील विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे यांचा निंबाळकरांना पाठिंबा

पंढरपूर/प्रतिनिधीःमाढा लोकसभा मतदारसंघात दररोज राजकीय घडामोडी घडत आहेत मोहिते पाटील कुटुंबाने भाडे भाजपला सोडचिट्टी देत राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला व जाहीरशील मोहिते पाटील हे माढा लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी पक्षाकडून निवडणूक लढवत आहे मोहिते पाटील यांच्या पक्षप्रवेशानंतर माढा मतदारसंघात दररोज राजकीय नवीन समीकरणे बदलत आहेत

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे पुतणे धवलसिंह मोहिते पाटील यांनी भाजप उमेदवार यांना पाठिंबा जाहीर केला आहे यांची दहशत



मोडून काढण्यासाठी आपण हा पाठिंबा दिला आहे. आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अकलूज येथे सभा होणार आहे तत्पूर्वीचे नाही निंबाळकर आणि भाजप आमदार गोरे यांनी धवलसिंह मोहिते पाटील यांची प्रतापगड यांच्या निवासस्थानी भेट घेतली त्याचबरोबर मोहिते पाटील यांनी भाजपच्या उमेदवारास पाठिंबा दिला मुळे महाविकास आघाडीला मोहिते कुटुंबाला हा मोठा धक्का आहे

# शहीद नागेश राक्षे यांच्यावर अंत्यसंस्कार

मेहकरः आरेगांव ता. मेहकर येथील बिएस एफ जवान नागेश राक्षे आसाम मध्ये त्रिपुरा येथे आपले कर्तव्य बजावत असताना दिनांक २४-०४-२०२४ रोजी रात्री साडेदहा वाजता शहीद झाले. शहिद नागेश राक्षे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करून,मेहनत व जिद्दीच्या जोरावर देशाची सेवा करण्याचे स्वप्न साकार करून आपले जिवन देशसेवेसाठी झोकुन दिले.

आपल्या सेवेमध्ये त्यांनी वेगवेगळ्या राज्यामध्ये कर्तव्य बजावून देशाची सेवा केली. सध्या ते त्रिपुरा येथील तुकडी मध्ये कार्यरत होते. २४ एप्रिल च्या रात्री सिमा पाहणी करताना त्यांना विर मरण आले. गरिब घरातील मुलांने देशसेवेची जिद्द करावी आणि हसत हसत देशसेवा करताना विरमरण यावे या घटनेने संपूर्ण जिल्ह्यातील लोकांचे मन भरून आले. शहिद नागेश राक्षे यांच्या वर दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी सांयकाळी चार वाजता त्यांच्या आरेगांव गावी अत्यंत भावून वातावरणात शासकीय नियमानुसार अत्यंसंस्कार करण्यात आले. नागेश राक्षे यांनी आपले जिवन देशासाठी दान देऊन खरी देशसेवा करून आरेगांव चे नाव देशपातळीवर लौकिक केले. नागेश राक्षे यांना बिएस एफ, बुलढाणा पोलीस यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

शहीद नागेश यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार म्हणून समस्त गावकरी यांनी आर्थिक सहकार्य केले. समस्त गावकरी, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, छत्रपती सेना, समाज एकता अभियान यांनी एकत्रित पणे आर्थिक मदत करून शहिद नागेश राक्षे यांना सलामी दिली.

# त्रिरत्नांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी




वाशीम : अनसिंग येथून जवळच असलेल्या मौजे जयपूर या गावात त्रिरत्नांची आगळी वेगळी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त पंचशील मित्र मंडळ जयपूर यांच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.कलकथित केरबाजी हरबजी इंगोले यांच्या स्मरनार्थ पायारुजी इंगोले यांनी विहारास बुद्ध मूर्ती दान दिली,श्रामणेर युवराज इंगोले यांनी त्रिशरण पंचशील घेऊन मूर्तीची प्रतिस्थापना केली,कार्यक्रमाला सुरुवात केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन व प्रसंग मागासवर्गीय समाजकल्याण संस्था जयपूर यांच्या विद्यमाने डॉ. गजपाल पायरुजी इंगोले यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले, गावचे प्रतिष्ठित नागरिक डॉ. विठ्ठल सरकटे यांनी फित कापून शिबिराचे उद्घाटन केले व शिबिरात उपस्थित माजी सरपंच विष्णू मस्के, वकील चव्हाण, उपसरपंच द्वारकाबाई इंगोले,कानबाराव मस्के पोलीस,जगदेवराव मस्के, प्रेमराव बर्गी,रोजगार सेवक प्रफुल इंगोले यांच्या हस्ते महापुरुषांची पूजा करण्यात आली. तसेच डॉ. गोटे व इतर डाक्टर यांनी गावातील नागरिकांचे मोफत तपासणी करून औषधोपचार केले व औषध निर्माता अधिकारी डॉ. प्रसेनजीत धडे, अधिपरिचारिका वैशाली काशिदे यांनी औषध वितरीत केले. वनरक्षक पदावर कार्यरत असलेले युवक सचिन बबन इंगोले यांनी महापुरुषांचे विचार व त्यांचे कार्य घराघरात पोहोचायला पाहिजे या उद्देशाने महापुरुषांच्या विचारांचे मोफत पुस्तके वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित बबन नामदेव इंगोले यांच्या हस्ते पुस्तके वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे ही जयंती खरोखर महापुरुषांच्या विचारांची जयंती ठरली.

तसेच संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, आणि संविधानाप्रति भारतीय नागरिकांचे कर्तव्य. या विषयावर वर्ग ५ वी ते १० मधील विद्यार्थ्यांसाठी अकिलेश पुंजारावव इंगोले वैद्यकीय समाज विकास अधिकारी बी. एम. सी.व अरविंद भगवान इंगोले महाराष्ट्र पोलीस यांच्या कडून निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकाना गावचे प्रेमराव बर्गी, भगवान इंगोले, बायनाबाई इंगोले व परम मुसळे सर यांच्या हस्ते प्रशस्ती पत्र ,पारितोषक आणि सन्मान चिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले सन्मान पत्र व पारितोषिक डॉ. गजपाल इंगोले व संजय इंगोले संचालक आपले सरकार केंद्र जयपूर यांचे कडून देण्यात आले . कार्यक्रमाला उपस्थित असलेले सामाजिक कार्यकर्ते शिक्षक परम मुसळे यांनी आपल्या मनोगतात अस्या स्तुत्य उपक्रमातून महापुरुषांचे विचार रुजविण्याचे काम होत आहे असे सांगून मंडळाची व आयोजकांची स्तुती केली. त्यानंतर सामूहिक स्नेहभोजन करुन हर्शोल्हासात अभिवादन रॅली काढण्यात आली सदर रॅलीत गावातील सर्व जाती धर्माचे नागरिक सहभागी होऊन सर्वांनी सहकार्य केले. अभिवादन रॅली मध्ये अहिल्याबाई होळकर जयंती उत्सव समिती,छ. शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती, मराठा सेवा संघ इत्यादी मंडळानी भाग घेतला,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचशील मित्र मंडळाने खूप परिश्रम घेतले.

# सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचे आता बॉलीवुड हिंदी चित्रपट लोरी म्युझिक दिग्दर्शनात पदार्पण

## लोरी हिंदी बॉलीवुड सिनेमा ३ में २०२४ जवळच्या सिनेमागृहात




नवी दिल्ली : सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख हे लेखन, दिग्दर्शन, गीतकार या पाठोपाठ आता म्युझिक दिग्दर्शन या नव्या रूपाने आपल्यासमोर येत आहेत. त्यांनी काल फेसबुक आणि इंस्टाग्रामवर त्याबाबत पोस्ट केली. अल्ताफ शेख यांच्या २०१८ मध्ये रिलीज झालेल्या वेडा बी.एफ. सिनेमातील हे माझे दुर्वेश बाबा या गाण्याची चक्क वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. त्यांनी आगामी हिंदी चित्रपट लोरी चे गीत लेखन केले असून चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन अल्ताफ शेख यांच्यासोबत सुधीर कुमार हजेरी लखनऊचे या दोघांनी मिळून सांभाळले आहे.

प्रसिध्द गायक सुरेश वाडकर, उर्मिला धनगर, स्वप्निल बांदोडकर, प्रियांका बर्वे आणि अंजली गायकवाड यांनी या चित्रपटाची गाणी गायली आहेत; ओम साई राम क्रिएटिव्ह वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाचे निर्माता अविनाश कवठणकर असून; दिग्दर्शन राजू रेवणकर यांचे आहे. डीओपी कुमार डोंगरे, पणती पटेल, राजकुमार, अली शेख, शान कक्कर, रंजीत दास, अभिलाषा घैरा, प्रतिभा शिंपी, आरती शिंदे; तर आर्ट- राजू माळी, मेकअप- केतन, कॉस्ट्यूम- संगीता चौरे आणि आरती पाटील कुलकर्णी, लाइन प्रोड्यूसर- शाहजहां शेख, प्रोडक्शन मैनेजर- अमजदखान शेख, किरण घोडके, अभिषेक चौरे हर्ष राजे मेकअप डिपार्टमेंट किरण सिद्दीद्दी आहेत. हिंदी आणि मराठीतले अनेक कलाकार या चित्रपटाचा भाग आहेत.

# महिलांच्या सन्मानासाठी आ.प्रणिती शिंदे यांना खासदार करा



सोलापूर/प्रतिनिधी : देशभरात महागाई, बेरोजगारी वाढली आहे. सामान्य जनतेचे जगणे मुश्किल झाले आहे. काँग्रेसने दिलेल्या पेन्शनवर बाप मुलांना जगवत आहे असे विदारक चित्र दिसून येत आहे अशी टीका करतानाच सोलापूर लोकसभा मतदारसंघात महिलांच्या सन्मानासाठी काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना खासदार करावे, असे आवाहन काँग्रेसच्या विविध विभाग सेलच्या मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांनी केले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस पक्षातील विविध ४३ विभाग आणि सेलचे प्रमुख पदाधिकारी राज्यभरात विविध मतदारसंघात काँग्रेसच्या ध्येयधोरण आणि विकास कामांची माहिती देण्याचे अभियान राबवत आहेत. हे सर्व पदाधिकारी सोलापुरात आले असताना आज रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांनी विविध विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार काँग्रेसच्या विविध विभाग व सेलचे पदाधिकारी गेल्या २६ मार्चपासून हे अभियान प्रत्येक मतदारसंघात राबवीत आहेत. काल सोलापूर जिल्ह्यात ते आले. काँग्रेस उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रत्येक सेल थेट लोकांपर्यंत घरोघरी जाऊन काँग्रेसचे गॅरंटी कार्ड लोकांना देत आहे. थेट प्रचार यंत्रणा राबविली जात आहे. या अभियानांतर्गत लोकांच्या मनात परिवर्तन होत असल्याचे दिसून येत आहे. काँग्रेस बाबत सकारात्मक मत लोकांमध्ये आहे. देशातील महागाई आणि बेरोजगारी याबाबत मतदारांमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. लोकांच्या मनातील भावना जाणून घेण्याचे प्रयत्नही सेलच्या माध्यमातून या अभियानाच्या माध्यमातून केले जात असल्याचे प्रज्ञा वाघमारे यांनी सांगितले.


देशात महागाई आणि बेरोजगारीने कळस गाठला आहे. काँग्रेसने दिलेल्या पेन्शनवर आजही निवृत्त बाप आपल्या मुलांना पोसत आहे अशी विदारक परिस्थिती आहे. मोदी सरकारने काय केले हे यावरून स्पष्ट होते असा आरोप प्रज्ञा वाघमारे यांनी केला. ईडीसह विविध शासकीय यंत्रणेच्या दबावाने काँग्रेसचे नेत्यांना भाजपात घेऊन गेले. फक्त नेते भाजपात गेले असून जनता मात्र आजही काँग्रेस सोबतच आहे, असे जिल्हा कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी स्पष्ट केले.

या अभियानाच्या अंतर्गत सोलापूर लोकसभा मतदारसंघात कालपासून लोकांशी संपर्क साधण्यात येत आहे. यादरम्यान सोलापुरात काँग्रेसच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या बाबत सकारात्मक वातावरण आहे. लोकांमध्ये उत्साह दिसून येत आहे. प्रणिती शिंदे यांनी गेल्या पंधरा वर्षात आमदार म्हणून विविध कामे केली आहेत. घरापासून दारापर्यंतचे प्रश्न सोडविण्यासाठी, सर्व योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता आ. प्रणिती शिंदे या निवडून येणे आवश्यक आहेत. सोलापूरकरांनी महिलांचा सन्मान करण्यासाठी आणि येथील महिलांनी महिलांना पुढे नेण्यासाठी आ. प्रणिती शिंदे यांना खासदार करावे, असे आवाहन यावेळी प्रज्ञा वाघमारे यांनी केले. काँग्रेसने आपल्या सत्तेच्या कार्यकाळात समाजातील विविध घटकांसाठी योजना राबविल्या. त्याचा लाभ सर्वांना दिला. आजही त्या योजनांची गरज असल्याचे लोक सांगतात, असे प्रदेश प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माथाडी कामगार विभागाचे प्रदेश प्रमुख छगन पाटील (भिवंडी), रोजगार व स्वयंरोजगार विभाग प्रदेश प्रमुखयोगेश मसलगे - पाटील (संभाजीनगर), विज्ञान-तंत्रज्ञान कौशल्य विभाग प्रदेश प्रमुख सुरेश यादव (बीड), वैद्यकीय सेल विभाग प्रदेश प्रमुख डॉ. मनोज राका (पुणे), औद्योगिक सेल प्रदेश प्रमुख डॉ. हेमंत सोनारे (नागपूर) , सुरक्षा रक्षक पश्चिम महाराष्ट्र विभाग अध्यक्ष भागेश देसाई, (कोल्हापूर), घरेलू कामगार सेलचे प्रदेश प्रमुख पूजा जेधे, रोजगार स्वयंरोजगार विभागाचे जिल्हाध्यक्ष अप्पू शेख, सेवा दलाचे अशोक कलशेट्टी, महिला काँग्रेसच्या सरचिटणीस मनीषा माने, चांद पाशा, कुणाल घोडके,अशोक पाटोळे,राजेंद्र शिरकूर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

### काँग्रेसला मतदान केले याची खात्री करा

सर्व मतदारांनी मतदान करावे. प्रत्येक मतदारांनी आपण काँग्रेसला मतदान केले याची खात्री व्हीव्हीपॅट चिट्ठीवर करावी. खात्री झाल्यानंतरच मतदान केंद्राबाहेर पडावे, असे आवाहन मुख्य संयोजिका प्रज्ञा वाघमारे यांनी केले आहे.

# प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा



सोलापूर/प्रतिनिधीः लोकसभेचे रणांगण आता तापायला सुरुवात झाली आहे. राज्यात सोलापूर मतदारसंघातील निवडणूक ही लक्षवेधी ठरत असून सोलापूर जिल्ह्यात दिग्गज नेत्यांच्या तोफा धडाडताना दिसून येत आहेत. दरम्यान, सोमवारी महविकास आघाडीचे सोलापूर मतदारसंघाचे उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ सोलापुरात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची जाहीर सभा पार पडणार आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक अधिक रंगतदार होताना दिसून येत आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा देणाऱ्या पक्षांची संख्या वाढत आहे. त्यामुळे विरोधकांकडून केंद्रातील दिग्गज मंत्र्यांची फौज सोलापूरातील भाजप उमेदवारराच्या प्रचारासाठी मैदानात उतरवली जात आहे. असे असले तरी प्रणिती शिंदे यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्रही सोलापूर मतदारसंघात दिसून येत आहे.

दरम्यान, प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीच्या नेत्यांच्याही जाहीर सभांचा धडका सोलापूर मतदारसंघात सुरू करण्यात आला आहे. राहुल गांधी, शरद पवार यांच्या पाठोपाठ आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची देखील जाहीर सभा पार पडणार आहे. ही सभा सोमवार दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता कर्णिक नगर येथील चिल्ड्रन्स गार्डन या मैदानावर आयोजित करण्यात आली आहे.या सभेला सोलापूरच्या उमेदवार प्रणिती शिंदे, माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी सोलापूर मतदार संघातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सभेसाठी उपस्थित राहावे , असे आवाहन महाविकास आघाडीचे नेत्यांनी केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती बोरगांव दे. येथे मोठ्या उत्साहात संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः महामानव,ज्ञानसागर,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती बोरगांव दे. येथे मोठ्या उत्साहात संपन्न. या वेळी एक छोटे खानी कार्यक्रमाच आयोजन करण्यात आलं होतं.ह्या कार्यक्रमात आंबेडकरवादी विचार जनते पर्यंत पोचावे ह्या उद्देशाने अनेक लहान थोर मंडळी आपले मनोगतं व्यक्त केलें. प्रमुख उपस्थित बोरगांव चे माजी सरपंच मा.श्री.मकबूल मुजावर व उपसरपंच श्री.अब्दुल पठाण यांच्या शुभ हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं. दिप प्रज्योलन पोलिस पाटील श्री.अभिजीत पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाला उपस्थित श्री.खाजू दादा गायकवाड माजी ग्रा.प.सदस्य,श्री.बाळकृष्ण बनसोडे साहेब ग्रा.प. सदस्य,श्री.गजानन कदम माजी ग्रा.प.सदस्य,श्री. फारूकभाई पठाण ड्रायव्हर ग्रुप अध्यक्ष,श्री.वाईदभाई पठाण प्रहार अध्यक्ष,श्री.राहुल गायकवाड ,श्री.अल्ताफ ताची,श्री.महिबूब पठाण,श्री.तेजस रणझुंजारे व आदि मान्यवर व भीम ज्योत तरुण मंडळ बोरगांव दे. येथील पदाधिकारी उपस्थित होते



# धैर्यशील मोहिते पाटलांच्या उमेदवारीने राज्यात परिवर्तनाची लाट : जयंत पाटील

अकलूज/प्रतिनिधीः ना खाउंगा, ना खाने दूंगा म्हणणाऱ्या मोदी सरकारने शेतकरी शेतमजूर कामगार लहानमोठे व्यापारी, सुशिक्षीत बेरोजगार तरुण महिला यांची महागाई, बेरोजगारी जीएसटी च्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेची लुट केली.विरोधकांना जेल मध्ये टाकून तसेच त्यांचे पक्ष फोडून त्यांना संपविण्याचे काम केले, जातीधर्मात तेढ निर्माण करुन या देशाची सर्वधर्म समभाव अशी ओळख पुसून टाकण्याचा प्रयत्न सुरु केला अशा धर्मांध, ढोंगी व उद्योगपतींना श्रीमंत करणा-या मोदी सरकारला नेस्तनाबूत करुन राज्यात महाविकास आघाडीला विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ जयंत पाटील यांनी केले माळशिरस तालुक्यातील निमगाव मगराचे येथे माढा लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ आ जयंत पाटील यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेस माजी आ रामहरी रुपनवर, राष्ट्रवादीचे नेते उत्तमराव जानकर पै. रावसाहेब मगर, छोटा रावसाहेब मगर, हणमंत पवार, महादेव मगर, गोरख मगर आदी मान्यवर उपस्थित होते. आ पाटील म्हणाले धैर्यशील मोहिते पाटलांच्या उमेदवारीने राज्यात परिवर्तनाची लाट आली आहे. देशात ४०० पार म्हणना-या भाजपाला आता २०० तरी जागा मिळतील का ? अशी शंका निर्माण झाली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत महागाई विरुध्द रान उठवणा-या मोदी सरकारच्या काळात महागाई गगनाला भिडली आहे. शेतमालाला दर नाही, तरुणांच्या हाताला काम नाही अशी परिस्थिती असताना देशातील २२ उद्योगपतींना श्रीमंत करायचे काम मात्र मोदी सरकार करीत आहे. हे धनदांडग्यांचे सरकार उलथवून टाका असे ते म्हणाले.

# अमोलराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त सेवेकऱ्यांच्या मुलांना सायकल भेट



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वभस्त अमोलराजे भोसले यांचा वाढदिवस कोणतेही डाम-डोल न करता अन्नछत्र मंडळात साधेपणाने साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त सेवेकऱ्यांच्या मुलांना सायकल भेट देण्यात आले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वछस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यास हे उत्तम रित्या सुरु आहे. या अन्नदान सेवेचा लाभ देश परदेशातून येणारे स्वामी भक्त नित्य घेत आहेत.

गुरूपौर्णीमेला महारक्तदान शिबीरच्या माध्यमातून गरजू लोकांना मदत केली जात आहे. याबरोबरच अमोलराजे भोसले यांच्या बरोबर हजारो युवावर्ग एकत्रीत येऊन श्री क्षेत्र अक्कलकोट येथे जुना राजवाडा परिसरात शिवजन्मोत्सोव सोहळा थाटात साजरा केला जातो. कोरोना काळात गरजूंना घरपोच जेवण, धान्य कीट व तालुक्यात विविध ठिकाणी कोरोना काळात केलेकी औषध फवारणी, तसेच न्यासकडून अक्कलकोट वासीयांना गरजू रुग्णांना रूग्णवाहीका आणि अग्निशामक गाडीची सोय करून देण्यात आली आहे. असे कित्येक सामाजिक उपक्रम मंडळाकडून राबविण्यात येत आहेत.

**भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा....**
**अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वरस्त अमोलराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांनी भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.**

याप्रसंगी अक्कलकोट तालुक्यासह सोलापूर शहर जिल्ह्यातील व नजीकच्या कर्नाटक राज्यातील विविध सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, डॉक्टर, वकील व पत्रकार, उद्योग, सहकार क्षेत्रातील मान्यवर व मित्र मंडळ, न्यासाचे पदाधिकारी, सेवेकरी, कर्मचारी यांच्याकडून अमोलराजे भोसले यांचा सत्कार करून, पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले. यावेळी अमोलराजे भोसले मित्र परिवार व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे पदाधिकारी, सेवेकरी व कर्मचारी आदिजन उपस्थित होते. हिरकणी महिला संस्थेच्या वतीने सत्कार सत्कार करण्यात आला.

# राम सातपुते यांना मत म्हणजे नरेंद्र मोदी यांना मत : आ.सचिन कल्याणशेट्टी



अक्कलकोट/प्रतिनिधीः देशाचा सर्वांगीण विकास करण्याचा ध्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतला आहे. भाजप व महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना मत म्हणजे भारताचे विकासपुरुष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच मत आहे, असे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील कासेगाव, वडजी, बक्षीहिप्परगे, मुळेगाव तांडा, दोड्डी, मुळेगाव, दर्गनहळ्ळी, धोत्री, मुस्ती, बोरामणी, वळसंग येथे आयोजित कॉर्नर सभेत आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. ते म्हणाले, काँग्रेसच्या काळात २७ वर्षांपासून रखडलेल्या पाण्याच्या योजनेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी दिला. कोटच्यवधींचा निधी खर्चून गावागावांमध्ये रस्ते तयार केले. श्रीरामाचे मंदिर आणि गरिबांना घरे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या काळातच झाली आहेत. त्यामुळे या निवडणुकीत नरेंद्र मोदींना साथ द्यावी द्यावी, असे उमेदवार आमदार सातपुते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब जनतेच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचे काम केले. मोदींनी गरिबांना गॅस, घर, शौचालय, शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये, आयुष्यमान भारत योजनेतून पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले.

मी ऊसतोड कामगाराचा मुलगा आहे. संघर्षातून यश मिळवले आहे. त्यामुळे सोलापूरकर माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असा विश्वास आहे व्यक्त केला. कासेगाव येथे भाजप प्रदेश महिला आघाडीच्या चित्राताई वाघ, मोतीराम राठोड, आनंद चंदनशिवे, यशपाल वाडकर, शंकर वाडकर, निशिकांत पाटील, प्रशांत जाधव, नेताजी खंडागळे, बालाजी चौगुले, प्रवीण चौगुले, ज्ञानेश्वर कदम, सुभाष येणगुरे, राजकुमार झिंगाडे, महादेव पाटील, सुनील कळके, रवींद्र रोकडे, जयश्री येणगुरे, तनुजा मुळे आदी उपस्थित होते.

# भाजपमुळे लोकशाहीला दृष्ट लागली : आ.प्रणिती शिंदे

मंगळवेढा/प्रतिनिधीः भाजपमध्ये लोकशाहीला दृष्टी लागली. आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा हे बिघडवायला निघाले आहेत. म्हणून हे लोक आपली संस्कृती परंपरा आपली एकी बिघडवत असतील आणि दुसरीकडे शेतकऱ्यांचा अंत करत असतील. आरक्षणासाठी हे बोलायला तयार नाहीत. ही खरी लोकशाहीची परीक्षा असल्याचे प्रतिपादन सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार



प्रणिती शिंदे यांनी केले आहे. हुलजंती येथे सभेत बोलत असताना प्रणिती शिंदे यांनी प्रतिपादन केले आहे. आज शनिवार दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी प्रणिती शिंदे यांनी बोराळे, मरवडे, हुलजंती सलगर बुद्रुक पंचायत समिती गण दौरा केला. यावेळी प्रणिती शिंदे बोलत होत्या. यावेळी त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या, मी सोलापूर जिल्ह्यात म्हणून शब्द दिला आहे पहिला आवाज लोकसभेमध्ये शेतकऱ्यांसाठी असेल. पहिला आवाज पाण्यासाठी आणि आरक्षणासाठी असेल. मी कामाची पक्के आहे. मी राजकारणात सत्तेसाठी आणि टक्केवारीसाठी आले नाही. मी तुमचा आशीर्वाद घेण्यासाठी आली आहे. ही निवडणूक जरी माझी असली तरी विजय तुमचा आहे, असे यावेळी प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणार

मी प्रतिज्ञापत्र तयार केले असून हे प्रतिज्ञापत्र दोन दिवसात तुमच्यासमोर जाहीर करणार आहे. दरम्यान, मी सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करणारच. सोलापूर जिल्हा लोडशेडिंगमुक्त करणार. शेतकऱ्यांना एमएसपी मिळवून देणार आणि कर्जमुक्त करणार. प्रत्येक गावात येणारा रस्ता मी करणार, सोलापुरात युवकांसाठी आयटी पार्क आणि नोकरीसाठी उद्योग आणणार, असे आश्र्वासन यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांनी दिले आहे. दरम्यान मी हे काम नाही केले तर, कान धरून खाली बसवण्याचा अधिकार देखील तुम्हाला असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे.यावेळी कार्याध्यक्ष अॅड नंदकुमार पवार, रतनचंद शहा बॅंकेचे अध्यक्ष राहुल शहा, दिलीप जाधव, फिरोज मुलाणी, चंद्रशेखर कौडूभैरी, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, प्रा.येताळा भगत, प्रथमेश पाटील, हणमंत दुधाळ, साहेबराव पवार, पांडुरंग चौगुले, पांडुरंग जावळे, दौलत माने, दादा पवार, साहेबराव पवार, पै.दामोदर घुले, मनोज माळी रविकरण कोळेकर, राजाराम जगताप, तुकाराम भोजने, अजय अदाटे पांडुरंग निराळे बापू अवघडे नाथा ऐवळे सुनीता अवघडे आदीसह काँग्रेस पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# पुण्यातील सोलापूरकरांचे कोणतेही काम तात्काळ मार्गी लावेन : अजित पवार



पुणेः बारामती लोकसभा निवडणुक महायुतीच्या अधिकृत उमेदवार आदरणीय सौ.सुनेत्रा वहिनी पवार यांच्या प्रचारार्थ आम्ही सोलापूरकर विचार मंच,पुणे आयोजित सोलापूरवासियांचा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत महीला प्रदेश अध्यक्ष रूपालीताई चाकणकर,प्रवक्ते उमेश पाटील सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या उपस्थितीत पुणे शहर उपाध्यक्ष संजय पाटील, राष्ट्रवादी युवक पुणे शहर निरीक्षक समाधान काळे यांनी अतिशय नियोजनबद्धेत आयोजित केला होता ...

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या मेळाव्यात बारामती लोकसभा मतदारसंघात पुणे येथील खडकवासला विधानसभा क्षेत्रात हजारोंच्या संख्येने रहात असलेल्या सोलापूरकर बांधवांशी संवाद साधला. यावेळी सोलापूरवासियांच्या समस्या जाणून घेत येणार्या काळात त्या ताकदीने सोडवण्यासाठी प्रयत्न करू असा विश्र्वास आदरणीय अजितदादांनी व्यक्त केला.विकासात्मक कामे आरोग्य विषयक अडचणी नोकरी संदर्भात कींवा सोलापूरकरांचे कोणतेही काम असूदेत ते तात्काळ मार्गी लावेन आठवड्यातून दोन दिवस मी पुण्यात असतो तुम्ही मला थेट भेटू शकता किंवा सोलापूरचे स्थानिक नेत्या मार्फत देखील आलात तरी चालेल असा शब्द दिला

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या विकासात्मक नेतृत्वात अधीक गतीने राज्याचा सर्वांगीण विकासा करण्या करीता बारामती लोकसभा महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनेत्रा वहिनी पवार यांना मतदान करून निवडून द्यावे आदरणीय नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आपले बहुमूल्य मत द्यावे असे आवाहन केले या मेळाव्याचे प्रास्ताविक समाधान काळे यांनी केले तर संजय पाटील यांनी या मेळाव्याचा उद्देश मांडला राज्याच्या महीला अध्यक्ष रुपालीताई चाकणकर,मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आपले विचार मांडून महायुतीला मतदान करण्याचे आवाहन केले .

या मेळाव्यास बाबा धुमाळ,विकास नाना दांगट,बाळासाहेब कापरे,शैलेश चारवाड,युवराज बेलदरे,संतोष फरांदे,दिलीस दादा नवले राजेंद्र थोरवे सुनील कलशेट्टी किशोर वावरे बाबा पाटील यशराज पाटील यांनी विशेष सहकार्य केले याप्रसंगी यावेळी राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर मुख्य प्रवक्ते उमेश पाटील सोलापूर जिल्हा अध्यक्ष संतोष भाऊ पवार कार्याध्यक्ष जुबेर भाई बागवान रमेश कोंडे सुधाकर जाधवर युवराज बेलदरे संतोष करांडे सनी मानकर सुनिता डांगे नाना पाटील वर्षा शिंदे पूजा झोळे राजेंद्र कोरवे आप्पा आखाडे सुरेश पालवे महेश पाटील यमराज पाटील प्रमोद भोसले खलील शेख हेमंत हंगट बाळासाहेब कापरे मारुती केंद्रे संजय पाटील समाधान काळे लतीफ तांबोळी राजू शेठ कुदळे विकास नाना दांगट राहुल पोकळे नानासाहेब नवले प्रकाश जाधव आशुतोष नाटकर नागेश निंबाळकर सोमनाथ शिंदे अल्मेराज आबादिराजे आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त पुणे येथील वास्तव्य करीत असलेले सोलापूरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सहकार महर्षी गणपतराव साठे जि.प.प्रशालेचे एनएमएमएस परीक्षेत यश



माढा/प्रतिनिधी : माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेत च्या ३६ विद्यार्थ्यांनी एन एम एम एस व छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग यश मिळवले असून आत्तापर्यंत या परीक्षेमध्ये गेल्या आठ वर्षांमध्ये एन एम एम एस आणि सारथी मधील एकूण २३२ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले असून या सर्व विद्यार्थ्यांना शासनाकडून १ कोटी ९९ हजार २०० रुपयांची रक्कम शिष्यवृत्तीच्या रूपात मिळणार आहे. प्रशालेच्या या निकालाने माढा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात सोलापुर जिल्हा परिषदेच्या या एकमेव माध्यमिक प्रशालेच्या यशाचा डंका सर्वदूर पोहोचला आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या निकालानुसार एनएमएमएस परीक्षेत ५ विद्यार्थी तर या अंतर्गत छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत ३१ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.या विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत दरमहा अनुक्रमे १००० व ८०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

चालू वर्षासह २०१६ पासून छचचड परीक्षेत प्रशालेच्या १२४ विद्यार्थ्यांना ५९ लाख ५२ हजार तर सारथी मधील १०८ विद्यार्थ्यांना ४२ लाख २७ हजार २०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. मुख्याध्यापक नागेश खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेतून यशस्वी विद्यार्थ्यांना एकूण १ कोटी ९९ हजार इतकी मोठी रक्कम विद्यार्थ्यांना मिळणार असल्याने माढा येथील सहकार महर्षी गणपतराव साठे जि प प्रशालेच्या या यशाचे संपुर्ण जिल्हाभरातून कौतुक होत आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना आदर्श शिक्षक श्री किरण भांगे व आदर्श शिक्षिका श्रीमती मीनाक्षी काशीद(खेडकर) यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्याथ्यांचे अभिनंदन.सौ.मनिषा आव्हाळे मॅडम मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर मा.कादर शेख साहेब शिक्षणाधिकारी जि.प.सोलापूर श्रीमती रूपाली भावसार मॅडम उपशिक्षणाधिकारी जि.प.सोलापूर

मा.संजय जावीर उपशिक्षणाधिकारी जि.प.सोलापूर नगराध्यक्षा मिनलताई साठे मा.महेश सुळे साहेब गट विकास अधिकारी पं.स.कुर्डूवाडी मा.विकास यादव साहेब गटशिक्षणाधिकारी पं.स.कुर्डूवाडी केंद्रप्रमुख दिगंबर काळे सुरेश माळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. नागेश खेडकर सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा सौ. लीना राऊत यांनी तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांनी, पालकांनी तसेच प्रशालेतील शिक्षकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

NMMS जिल्हा गुणवत्ता यादीत आलेले ५ (शिष्यवृत्ती पात्र)विद्यार्थी खालीलप्रमाणे

१) गोरे अनुराग अंकुश २) कु. रवेकर सायली समीर ३) कु. सक्री प्रेरणा विशाल ४) साळुंके शिवम विनोद ५) कु. कदम अक्षय अमोल

NMMS अंतर्गत छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र ३१ विद्यार्थी

१) चवरे कृष्णदेव अभिमन्यू २) कु. जुगदार संस्कृती तुषार ३) कदम हरिदास मोहन ४) कु. भांगे श्रेया सोमनाथ ५) भांगे किर्तीराज धैर्यशील ६)कु. मुकणे शर्वरी अमोल ७)कु. सुरवसे शिवनेरी वैजिनाथ ८) कु.उन्हाळे लक्ष्मी राजेंद्र ९) कु.मस्के गौरी समाधान १०)कु. मोहिते श्रावणी विष्णू ११) हांडे कृष्णा गोवर्धन १२) कु.मिरगणे पद्मजा अमोल १३) कु.कदम श्र्लोका निवास १४) कु.तांबिले स्नेहल राजेंद्र १५) कु. कदम वेदिका सुनील १६) कु.फरतडे सृष्टी शंकर १७) पवार अथर्व प्रवीण १८) कु.बावणे सायली हनुमंत १९) कु. भांगे सानिया उमेश २०) कु. शिंदे संस्कृती सुरेश २१) कु.सुरवसे श्रुती आण्णा २२) कु.भांगे अबोली किरण २३) पाटेकर अथर्व भारत २४) चव्हाण शिवराज जीवन २५) भांगे अथर्व बाळासाहेब २६)डोंगरे अथर्व अभिजीत २७)कु. घाडगे वैष्णवी शैलेश २८) कदम अभिषेक बालाजी २९) कु.गवळी वैष्णवी सुहास ३०) भांगे सार्थक सुरेश ३१) रणदिवे समर्थ नागनाथ